| | | |
|---|---|---|
| | वाकड पोलीस ठाणे,<br>पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिचवड | |
| | प्रेसनोट | दिनांकः २१/१२/२०२४ |

# वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड यांनी सुमारे २० लाख रुपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे १२० मोबाईल महाराष्ट्र व इतर राज्यातून शोध घेऊन नागरिकांना केले परत.

---

आजच्या आधुनिक काळात मोबाईल ही चैनीची वस्तु न राहता गरजेची वस्तु झालेली असून दैनंदिनी व्यवहार, संपर्क, करमणुक, फोटो याकरिता मोबाईलचा अविरतपणे वापर होत असतो. मोबाईलबाबत प्रत्येक व्यक्ती खूप संवेदनशील असतो. मोबाईल हरवला चोरी झाला अथवा गहाळ होताच संबधीत व्यक्तीला होणारे दु:ख व काळजीसह तो पोलीस स्टेशन येथे मदतीकरिता येत असतो.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमधील नागरिकांचे गहाळ/चोरी झालेल्या मोबाईल फोनचा सर्वोतोपरी शोध घेऊन ते नागरिकांना परत मिळवून देण्याबाबत मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ. शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये विशेष मोहिम राबविणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने श्री. विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त,परि-२ व श्री. सुनिल कुराडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वाकड विभाग यांचे मागदर्शनाखाली वाकड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निवृत्ती कोल्हटकर यांनी नागरिकांचे चोरी/ गहाळ झालेले मोबाईल फोनचा शोध घेऊन ते नागरिकांना परत मिळवून देणेकरिता पोहवा. शहाजी धायगुडे, पोशि. कौंतेय खराडे व पोशि. प्रमोद गायके यांचे एक विशेष पथक तयार केले. CEIR (Central Equipment Identity Register) या पोर्टलव्दारे गहाळ झालेले मोबाईल ट्रेस करुन गहाळ झालेले मोबाईल हे पिंपरी चिंचवडसह महाराष्ट्रातील वेगवेगळे जिल्हे तसेच बिहार, कर्नाटक, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश येथे ट्रेस झालेले मोबाईल जे व्यकती वापरत आहेत किंवा ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांचेशी संपर्क करुन मोबाईल परत करणेबाबत सांगितले. तसेच प्रसंगी कायद्याचा धाक दाखवून महाराष्ट्रासह इतर राज्यातून काही मोबाईल परत मागविले अनेक मोबाईल प्रत्यक्ष जाऊन हस्तगत करण्यात आले.

मागील दोन महिन्यांमध्ये वाकड पोलीस ठाणेकडून सुमारे २० लाख रुपये किंमतीचे १२० मोबाईल हस्तगत करण्यात आले असून यापुढेही अशीच मोहिम राबवून नागरिकांचे गहाळ/चोरी झालेले मोबाईल परत करण्याचे कार्यवाही चालू आहे. नागरिकांना मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी पोलीसांप्रती समाधान व्यक्त करुन पिंपरी चिंचवड पोलीसांचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ.शशीकांत महानवर, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, श्री.विशाल गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परि-२, श्री. सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग यांचे मार्गदर्शना खाली वाकड पोलीस ठाणेकडील श्री. निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोहवा. शहाजी धायगुडे, पोशि. कौंतेय खराडे व पोशि. प्रमोद गायके यांनी केली आहे.

**(विशाल गायकवाड)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ -२, पिंपरी चिंचवड